# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

**डॉ. शाकेरा इनामदार**
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
**कार्यक्रम समन्वयक**

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१


संदर्भ क्र.रासेयो/६६७/२०१३ दिनांक : २५/०३/२०१३

प्रति
**मा. प्राचार्य/रासेयो कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो कार्यरत असलेली सर्व संलग्न महाविद्यालये**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**

**विषय: 'आव्हान' आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर निवड चाचणी शिबिराकरीता स्वयंसेवक पाठविणेबाबत...**

**महोदय/महोदया,**

मागील वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजना मध्ये कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांसाठी **'आव्हान—राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर'** आयोजित करण्यात येत असून सन २०१३—२०१४ या वर्षातील शैक्षणिक वर्षातील आव्हानचे प्रशिक्षण शिबिर जून २०१३ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

त्यानुसार सदर शिबिरांमध्ये प्रत्येक जिल्हयातून ३० रासेयो स्वयंसेवक याप्रमाणे ३० X ३५ जिल्हे = १०५० इतके स्वयंसेवक सहभागी होणार असून **'आव्हान'** या शिबिरामध्ये पुणे विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर, नाशिक या तीन जिल्हयांमधून रासेयोचे ९० विद्यार्थी व ६ कार्यक्रम अधिकारी असा संघ सहभागी होणार आहे.

तरी सदर आव्हान प्रशिक्षण शिबिराकरीता रासेयो स्वयंसेवक निवड चाचणी शिबिराचे आयोजन पुणे विद्यापीठ येथे करावयाचे असून सदर आव्हान राज्यस्तरीय निवड चाचणी शिबिराकरीता आपल्या महाविद्यालयातील १ रासेयो स्वयंसेवक व १ स्वयंसेविका याप्रमाणे दोन स्वयंसेवकांची नावे रासेयो कार्यालयास दि. १० एप्रिल २०१३ पर्यत कळविण्यात यावेत ही विनंती. (कृपया सोबत दिलेल्या नियमावलीप्रमाणे स्वयंसेवकांची निवड करणे आवश्यक आहे. तसेच सोबत दिलेले मेडीकल फिटनेस सर्टिफिकेट भरून आणणे आवश्यक आहे. निवड चाचणी शिबिरात निवड झालेल्या स्वयंसेवकांना पुढे जून २०१३ महिन्यामध्ये 'आव्हान' राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराकरीता उपस्थित रहावे लागेल. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचा प्रवासखर्च रासेयो नियमित कार्यक्रमातून करावा )

**कळावे,**

**कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

सोबत : स्वयंसेवक निवड — नियमावली

## 'आव्हान' आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराकरीता
## स्वयंसेवक निवडीबाबतची नियमावली

१. स्वयंसेवकाचे वय १८ वर्षे पूर्ण असावे.

२. स्वयंसेवक शारीरिकदृष्टया सक्षम असावा.

३. स्वयंसेवकाची उंची १६५ से.मी. व स्वयंसेविका १५५ से.मी. उंची असणे आवश्यक आहे.

४. शिबिराकरीता निवड करण्यात आलेले स्वयंसेवकाचे वजन ५० कि.मी. पेक्षा कमी तसेच शारिरीक दृष्टया उंचीच्या प्रमाणापेक्षा जास्त नसावे.

५. स्वयंसेवकाची निवड करतांना शक्यतो द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेला असावा. तसेच त्याने राष्ट्रीय सेवा योजनेचे एक विशेष शिबिर पूर्ण केलेले असावे.

६. Sports/NCC/Scout or Guide/ Trekking or Hiking/RSP/Civil Defense/First AID प्रशिक्षण पूर्ण केलेल्या/सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्राध्यान्य देण्यात यावे.

७. शैक्षणिक दृष्टया परिपूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात यावी. म्हणजेच ATKT विद्यार्थ्यांची निवड करण्यात येवू नये.

८. राष्ट्रस्तरीय/राज्यस्तरीय पूर्व संचलन (Pre NRD/SRD) शिबिर तसेच मेगा कॅम्प, साहसी शिबिरात मध्ये सहभागी विद्यार्थ्यांना प्राधान्य दयावे.

९. मुली १ कि.मी. मुले २ कि.मी. धावणे यादृष्टीने शारिरीक दृष्टया सक्षम स्वयंसेवकांची निवड करण्यात यावी.

१०. स्वयंसेवकाने निवड शिबिराकरीता येतांना सोबत दिलेले मेडीकल प्रमाणपत्र भरून आणणे आवश्यक आहे.

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना
पुणे विद्यापीठ, पुणे